वाचा :- १. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ३६, दिनांक ३० जुलै २००९.
२. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक १२, दिनांक १५ सप्टेंबर २०१५.
३. संचालनालयाचे परिपत्रक क्र. स्था.१८/ब/ सन २००७-०८/लेपअ/पं.रा.स./१६९४, दि. २७.११.२००८.

---

स्था. १८/ब/जि.प/पं.स/ले.प./वलेप अहवाल/न.क्र. २३६.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, ६ वा मजला,**
**कोंकण भवन, नवी मुंबई- ४०० ६१४.**

**स्थायी आदेश क्र. ०७ /२०१७ दिनांक : 18 APR 2017**

विषय :- जिल्हा परिषद व ' अ ' वर्ग नगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ यांच्या लेखापरीक्षणासंदर्भात जिल्हा सहाय्यक संचालक यांनी करावयाच्या कामकाजाबाबत.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त वाचा मधील आदेशांन्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपालिका शिक्षण मंडळ व नगरपंचायतींच्या लेखापरीक्षणासाठी पथक प्रमुख व लेखापरीक्षणाचे संनियत्रंण व अहवालाचे अंतिमिकरणाबाबतचे प्राधिकारी निश्चित करण्यात आले आहेत.

उपरोक्त वाचा मधील आदेश क्र. १ अन्वये जिल्हा परिषदेच्या वित्त, बांधकाम, लघुपाटबंधारे (सिंचन) व ग्रामीण पाणी पुरवठा या विभागांचे तसेच 'अ' वर्ग नगपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळांच्या लेखापरीक्षणाकरीता पथक प्रमुख म्हणून जिल्हा सहाय्यक संचालक काम पाहतील तसेच त्यांना वरिल ४ जिल्हा परिषद विभागांच्या लेखापरीक्षणासाठी प्रति विभाग १० श्रमदिन व 'अ' वर्ग नगपालिका /नगरपालिका शिक्षण मंडळाच्या लेखापरीक्षणासाठी ४ श्रमदिन निधारित करण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेच्या उपरोक्त ४ विभागांचे तसेच 'अ' वर्ग नगपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळांच्या लेखापरीक्षणामध्ये सर्व जिल्हा सहाय्यक संचालक यांनी नोंदविलेल्या आक्षेपांचा आढावा घेतला असता बहुतांश जिल्हा सहाय्यक संचालक यांनी प्रत्यक्ष लेखापरीक्षणाचे कामकाज केले नसल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. यास्तव जिल्हा सहाय्यक संचालक यांनी जिल्हा परिषदेच्या वित्त, बांधकाम, लघुपाटबंधारे (सिंचन) व ग्रामीण पाणी पुरवठा या विभागांचे व 'अ' वर्ग नगपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळांच्या लेखापरीक्षणादरम्यान पथक प्रमुख म्हणून कामकाज संदर्भात तसेच उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासंदर्भात खालील प्रमाणे पुरक आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**आदेश :-**

अ) जिल्हा सहाय्यक संचालक हे जिल्हा परिषदेचे सर्व विभाग, पंचायत समित्या, नगरपालिका, नगरपालिका शिक्षण मंडळे, नगरपंचायती व ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षण संनियंत्रणाकरिता जबाबदार असतील.

ब) जिल्हा सहाय्यक संचालक हे जिल्हा परिषदेच्या वित्त, बांधकाम, लघुपाटबंधारे (सिंचन) व ग्रामीण पाणी पुरवठा या विभागांचे तसेच ' अ ' वर्ग नगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळे यांच्या लेखापरीक्षणादरम्यान पथक प्रमुख म्हणून कामकाज पाहतील.

जिल्हा सहाय्यक संचालक यांनी पथक प्रमुख म्हणून कामकाज पाहतांना लेखापरीक्षण सुरु होण्यापूर्वी रु. १,००,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या पूर्ण झालेल्या बांधकामे /विकास कामांची यादी संबंधित संस्थेंकडून प्राप्त करुन घ्यावी. सदर यादीतील सर्वात जास्त रकमेच्या किमान १० बांधकामे /विकास कामांची प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, मोजमाप पुस्तिका व कामाची सर्व देयके व अनुषंगीक कागदपत्रांची सखोल तपासणी स्वतः करावी.

क) जिल्हा परिषदेच्या **सर्व विभागांचे** व ' अ ' वर्ग नगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळे यांच्या खालील बाबींचे लेखापरीक्षण /तपासणी जिल्हा सहाय्यक संचालक यांनी करावी.

**१. खरेदीचे प्रस्ताव** - जिल्हा सहाय्यक संचालक यांनी लेखापरीक्षण सुरु होण्यापूर्वी रु. ५०,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या खरेदीच्या प्रस्तांवाची यादी संबंधित संस्थेंकडून प्राप्त करुन घ्यावी. सदर यादीतील सर्वात जास्त रकमेच्या किमान १० खरेदीच्या प्रस्तावांची प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, खरेदीची सर्व देयके व अनुषंगीक कागदपत्रांची तपासणी करावी.

**२. वैयक्तिक लाभार्थी योजना :-** जिल्हा परिषद व ' अ ' वर्ग नगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळे यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या रु. १०,००,०००/- रकमेवरील कल्याणकारी योजनांपैकी किमान ३ योजनांचे प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, लाभार्थी निवड प्रक्रिया, निविदा प्रक्रिया, साहित्य /रोख अनुदान वाटपाच्या प्रस्तांवाची तपासणी करावी.

**३. स्थानिक स्वराज्य संस्थांचे पारित ठराव :-** जिल्हा परिषद व ' अ ' वर्ग नगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळे यांच्याकडून मंजूर झालेले सर्व प्रकाराच्या ठरावांची तपासणी करावी.

सदर आदेशातील सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

( प्रताप मोहिते),
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव :

१. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण/ पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.

२. सर्व जिल्हा सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा.